नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
शासकीय कुटीर क्र.७, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४००० ०२१.
दूरध्वनी : ०२२-२२०४४९५२/२२०४५७०६ फॅक्स: २२८८६६६६
ई-मेल: clmms@yahoo.in; dclmms@yahoo.in / dclmms_complaints@yahoo.com

क्र. वैमाशा- /व.मा./पड./परिपत्रक/२०१५ | १२२५ दिनांक:-११मार्च, २०१५

# परिपत्रक

वैध मापन शास्त्र अधिनियम,२००९ मध्ये वजन व मापांची पडताळणी व मुद्रांकन करण्याची सर्व जबाबदारी वैध मापन शास्त्र चे कलम २४ प्रमाणे उपयोगकर्त्यांवर टाकण्यात आली आहे. मात्र महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मध्ये, दुरुस्त केलेले उपकरण यांचे मुद्रांकन व पडताळणी करण्याची जबाबदारी नाहक दुरुस्ताकांवर टाकण्यात आली असल्यामुळे काही काळापासून याबाबत मा. उच्च न्यायालयात याचिका व या कार्यालयास निवेदन प्राप्त झालेले आहेत.

दुरुस्तकांचे काम सुरळीत स्वरुपात चालू ठेवण्यासाठी वा त्यांचेवर अधिनियमात नसलेली जबाबदारी नाहक त्यांचेवर न टाकण्यासाठी वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ चे कलम १४(४) व महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ चे नियम ८(१)(ड) मधील नियंत्रक वैध मापन शास्त्र यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येतात.

१) दुरुस्त केलेले वजन व माप यांची पडताळणी व मुद्रांकन करण्याची जबाबदारीं उपयोगकर्त्याची राहिल.

२) दुरुस्तक यांनी वजन व माप उपयोगकर्ता यांच्या गरजेनुसार दुरुस्त करावे.

३) नियम ११ खालील परिशिष्ट ८ अन्वये दुरुस्तकांनी ठेवावयाच्या नोंदवहीमध्ये पडताळणी व मुद्रांकनाबाबतचा तपशिल लिहिण्याची आवश्यकता नाही.

४) दुरुस्ती करण्यासाठी वैध मापन शास्त्र अधिकारी यांनी लावलेले सिल तोडण्याची गरज भासल्यास सदर बाबतची माहिती वैध मापन शास्त्र अधिकारी यांना देणे व त्याना परत मुद्रांकीत करुन घेण्याची जबाबदारी उपयोगकर्त्याची राहिल.

५) मुद्रांकन केल्यानंतर परिशिष्ठ ९ प्रमाणे कलम १४(३) अन्वये देण्यात येणारे पडताळणी प्रमाणपत्रामधील दुरुस्तक यांचे नांवाऐवजी उपयोगकर्त्याचे नांव लिहीण्यात यावे.

वरील निर्देश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयावेत.

(संजय पाण्डेय)
नियंत्रक, वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
सर्व उप नियंत्रक,
वैध मापन शास्त्र.